पोलीस आयुक्तालय नवी मुंबई

प्रेसनोट

CB/12 /2026

गुन्हे शाखा, नवी मुंबई

दिनांक २६.०२.२०२६

# ४८ तासाच्या आत बेवारस मृतदेहाची ओळख पटवुन, खून करणा-या आरोपींना गुन्हे शाखेने केले अटक

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.सचिन गुंजाळ यांनी शरीराविरूध्दचे गंभीर गुन्हे उघडीस आणणेकामी आदेशीत केले आहे.

रबाळे एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे हद्दीत दिनांक १६/०२/२०२६ रोजी बेवारस मृतदेह मिळुन आला. त्याबाबत अकस्मात मृत्युचे प्रकरण दाखल करण्यात आले. मयत इसमाचे शवविच्छेदनानंतर वैद्यकीय अधिकारी यांनी मारहाणीमुळे मृत्यु असा अभिप्राय दिल्याने रबाळे एम. आय.डी.सी. पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. ६३/२०२६ बीएनएस २०२३ चे कलम १०३(१) प्रमाणे दिनांक १७/०२/२०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन अनोळखी मयत इसमाची ओळख पटविणेकामी तांत्रीक तपास केला असता, मयत इसमाचे नाव संदीप लक्ष्मीकांत विश्वकर्मा, वय ३१ वर्ष, राह. मानखुर्द, मुंबई असे असल्याचे कळले. सदर इसम दिनांक १५/०२/२०२६ रोजी पासुन बेपत्ता असल्याबाबत ट्रॉम्बे पोलीस ठाणे येथे नोंद करण्यात आलेली होती. मयत इसम संदीप याचे प्राप्त मोबाईलचे तांत्रिक विश्लेषणामध्ये मयत इसमाचा दिनांक १५/०२/२०२६ रोजी कोपरी, सेक्टर २६, वाशी परिसरात वावर होता व एका भंगार व्यावसायिकाशी संभाषण झाले होते. त्याअनुषंगाने भंगार व्यावसायिकाकडे चौकशी केली असता, दोन कार व मोटार सायकलवरून आलेल्या इसमांनी यातील मयत संदीप यास त्याचे दुकानात आणले होते. त्यानंतर सदर इसम, मयत व्यक्ती व भंगार व्यावसायिक हे महापे पुलाखाली ऑफिस-गोडाऊनमध्ये गेले होते. त्यावेळी मयत संदीप यास मारहाण करणा-यापैकी संकेत जगताप याने व्यावसायिकाकडुन फोन पे द्वारे रक्कम स्विकारून व्यावसायिकास सोडुन दिले होते. त्यावरून संकेत जगताप यास ताब्यात घेऊन चौकशी केल्यावर माहिती मिळाली की, मयत संदीप हा विद्युत खांब व डिपीमधील वायर चोरी करून भंगारात विकत होता. दिनांक १५/०२/२०२६ रोजी संदीप हा चोरी करताना पकडला गेला त्यावेळी १) प्रीतम भरत भोईर, २) शिवाजी शंकर डुंबरे, ३) अमोल रमेश गुंजाळ, ४) संकेत राजाराम जगताप उर्फ बाब्या यांनी संदीप यास मारहाण केली. सदर मारहाणीत संदीप याचा मृत्यु झाला. त्यानंतर संकेत याने त्याचेजवळील रिक्षा आणुन त्याने व अमोल गुंजाळ असे दोघांनी मिळुन संदीप याचा मृतदेह महापे एम.आय.डी.सी.मधील नाल्याजवळ फेकुन दिला.

**अटक आरोपींची नावे -**

१) प्रीतम भरत भोईर, वय २६ वर्ष, धंदा व्यवसाय, राह. सीवाईल्ड रेसीडेन्सी, सेक्टर १४, कोपरखैरणे, नवी मुंबई

२) शिवाजी शंकर डुंबरे, वय ५७ वर्ष, धंदा व्यवसाय, राह. रूम नं. २०१, रघुवीर अर्पाटमेंट, सेक्टर २३, जुईनगर, नवी मुंबई

३) अमोल रमेश गुंजाळ, वय ३१ वर्ष, धंदा इलेक्ट्रीशीयन, राह. साईविरा अर्पाटमेंट, गजानन चौक, सेक्टर ५, सानपाडा, नवी मुंबई

४) संकेत राजाराम जगताप उर्फ बाब्या, वय २९ वर्ष, धंदा रिक्षा चालक, राह. रूम नं. ४११, हनुमान नगर, तुर्भे एमआयडीसी, नवी मुंबई

सदर कारवाईमध्ये सहा. पोलीस आयुक्त, प्रेरणा कट्टे, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ कडील वपोनि/ तानाजी भगत, सपोनि/निलेश बनकर, सपोनि/अनंत लांब, पोउपनिरी/ अभय काकड, पोउपनिरी प्रदिप बोरूडे, पो.हवा./देवेंद्र सुर्यवंशी, पो.हवा./दिपक मोरे, पो. हवा./प्रकाश साळुंखे, पोना/अझहर मिर्झा, पोशि/विशाल सावरकर, पोशि/सचिन पाटील यांचा सहभाग आहे.

------------------ooo------------------